# डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्‌यापीठ,

**छत्रपती संभाजीनगर**

**संलग्नित**

**आदर्श शिक्षण संस्था, बीडचे**

# कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्‌यालय,

**ता. शिरूर (का.) जि. बीड- ४१३२४९**

# आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग

## वार्षिक अहवाल- शै. वर्ष २०२३ - २४

**समन्वयक** **प्राचार्य**

आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

**कालिका देवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (कासार) जिल्हा. बीड**

## 1. अहवाल शै. वर्ष २०२३ - २४ (महाविद्यालय स्तर)

# सामाजिक न्याय दिन

---

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार विभाग राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी सांगितले की राजश्री शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने आरक्षण आणि सामाजिक न्याय अंमलबजावणी करणारे राजे होते. त्यांनी प्रत्यक्षात सामाजिक समता प्रस्थापित केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पवार बी टी यांनी केले. आभार प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी मांनले यावेळी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहु संख्येने उपस्थित होते.

---

कार्यारंभ
Tuesday 2023/06/27

## कालिकादेवी महाविद्यालय, शिरुर



**शिरुर,** दि.२६ : येथील कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .विश्वास कंधारे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी

## कालिका देवी महाविद्यालयात न्याय दिन

**शिरूर / प्रतिनिधी :**कालिकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या वेळी प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

Smart beed Edition
Jun 27, 2023 Page No. 03
Powered by : eReleGo.com

अहवाल २ दि. २८/०७/२३

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी

---

कालिकादेवी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार व राष्ट्रीय सेवा योजना या विभागाच्या संयुक्त विद्यमाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी विषयी सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर सभागृहात तसेच जिल्हा परिषद शाळेत कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी डॉ. संजय सावते, डॉ. विश्वास कंधारे, प्रा. डॉ. प्रकाश घोलप, डॉ. तनवीर पठाण, डॉ. चेतना डोंगरीकर उपस्थित होते.

यावेळी सावते म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे व्यवसायाभिमुख बनवलेले आहे. त्याच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. शिक्षणामुळे स्वावलंबित्व निर्माण करता आले पाहिजे, असे ते म्हणाले.

याप्रसंगीप्राचार्य डॉ. विश्वास कंधारे म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना विविध विद्यार्थ्यांच्या वाटा खुल्या झालेल्या आहेत. या धोरणामुळे विद्यार्थी कोणत्याही विद्या शाखेतील विषय घेऊन अभ्यास करू शकतो. आवडीप्रमाणे विषय घेऊन अभ्यास करण्याची संधी या धोरणामुळे मिळालेली आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पवार बी. टी. यांनी केले व आभार प्रा. डॉ. संदीप संपाळ यांनी मांनले. या प्रसंगी बहुसंख्येने विद्यार्थी व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत

# शैक्षणिक धोरण व्यवसायाभिमुख; मुलांना विद्यार्जनाच्या वाटा खुल्या

## रासेयो, आजीवन शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरूर कासार** : कालिका देवी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन शिक्षण संस्था व विस्तार सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर सभागृह व जिल्हा परिषद शाळेत कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी डॉ. संजय सावते, प्रा. डॉ. विश्वास कंधारे, डॉ. प्रकाश घोलप, डॉ. तन्वीर पठाण, डॉ. चेतना डोगळीकर उपस्थित होते.

यावेळी सावते म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे व्यवसायाभिमुख बनवलेले आहे. त्यांच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. शिक्षणामुळे स्वावलंबित्व निर्माण करता आले पाहिजे, असे ते म्हणाले.

कंधारे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना विविध विद्यार्जनाच्या वाटा खुल्या झालेल्या आहेत.

या धोरणामुळे विद्यार्थी कोणत्याही विद्याशाखेतील विषय घेऊन अभ्यास करू शकतो. आवडीप्रमाणे अभ्यास करण्याची संधी या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना मिळालेली आहे. सूत्रसंचालन डॉ. बी. टी. पवार यांनी, तर आभार डॉ. प्रा. संदीप संपाळ यांनी मानले.



रासेयो, आजीवन शिक्षण संस्था व विस्तार सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर.

Hello Beed
Page No. 4 Jul 31, 2023
Powered by: erelego.com

अहवाल ३ दि. १/०८/२०२३

# अण्णाभाऊ साठे जयंती

कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.



पुण्य नगरी

**अण्णाभाऊ साठे जयंती साजरी**

**शिरूर/प्रतिनिधी :** शहरातील कालिकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती महाविद्यालत प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Smart beed Edition
Aug 3, 2023 Page No. 02
Powered by : eReleGo.com

## कालिकादेवी महाविद्यालयाच्या वतीने आजोळ परिवार राक्षसभुवन येथे गरजूंना ब्लँकेट व किराणा वाटप

---

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन शिक्षण विस्तार विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्या

संयुक्त विद्यमाने आजोळ परिवार राक्षसभुवन येथे गरजूंना ब्लँकेट व किराणा वाटप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे तसेच राक्षसभुवन येथील सरपंच दत्तात्रय तांबे पाटील व पोलीस पाटील दिनकर शंकरराव तांबे आजोळ परिवाराचे संस्थापक करण तांबे त्यांच्या हस्ते राक्षसभुवन येथे आजोळ परिवार येथे गरजूंना ब्लँकेट वाटप करून  वृद्धाश्रमामध्ये किराणा  वाटप करण्यात आला. तसेच  उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आजोळ वृद्धाश्रमामध्ये वृक्षारोपण ही करण्यात आले.याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी बहु संख्येने उपस्थित होते.

.

कार्यारंभ
Sunday 2023/10/22

## आजोळ परिवारात गरजुंना ब्लँकेट व किराणाचे वाटप



प्रतिनिधी । शिरुर

दि.२१ : येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाशविभाग, अजीवन व विस्तार सेवा विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आजोळ परिवार राक्षसभुवन येथे गरजूंना ब्लँकेट व किराणा वाटप करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.विश्वास कंधारे, मा.सरपंच दत्तात्रय तांबे, पोलीस पाटील दिनकर शंकर तांबे तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आजोळ वृद्धाश्रमामध्ये वृक्षारोपण ही करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी



# आजोळ परिवाराला किराणा साहित्याचे वाटप

**शिरूर / प्रतिनिधी** :शहरातील कालिकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग,अजीवन व विस्तार सेवा विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आजोळ परिवार,राक्षसभुवन येथे गरजूंना ब्लॅकेट व किराणा वाटप करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे तसेच राक्षसभुवन येथील दत्तात्रय तांबे,पोलीस पाटील दिनकर तांबे, आजोळ परिवाराचे संस्थापक करण तांबे यांची उपस्थिती होती.याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.या वेळी आजोळ प्रकल्पाच्या परीसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण देखील करण्यात आले.

Smart beed Edition
Oct 22, 2023 Page No. 03
Powered by : eReleGo.com

अहवाल ४

# विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

२६/१२/२०२३ वार मंगळवार

---

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक पाच डिसेंबर २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व आदर्श शिक्षण संस्था बीड, कालिका देवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर कासार, यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन आजीवन व शिक्षण विस्तार विभागाचे संचालक डॉ. आनंद वाघ यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारेहोते.

यावेळी बोलताना डॉ. वाघ सरांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण पारंपारिक शिक्षणाच्या कक्षा तोडून व्यवसायाभिमुख धोरण आखण्यात आले आहे. यामध्ये कुठल्याही शाखेचा विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार विषय घेऊन आपले करिअर करू शकतो. तशी संधी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे उपलब्ध झालेली आहे.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्या शाखांना महत्त्व नसून आपल्या आवडीच्या विषयात तुम्ही किती प्राविण्य प्राप्त केले आहे? त्यावरून तुमची शाखा ठरेल.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. विश्वास कंधारे सरांनी सांगितले की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी आजीवन व शिक्षण विस्तार विभागाने संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

प्रजापत्र

07DEC2023

पत्रकार अंगद पानसंबळ

# कालिकादेवी महाविद्यालयात विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्घाटन



शिरूरकासार दि.६ (प्रतिनिधी)- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व आदर्श शिक्षण संस्था बीडचे कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय विद्यार्थी संपुदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर येथील संचालक अजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे डॉ.आनंद वाघ यांच्या हस्ते करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ.आनंद वाघ म्हणाले की, अजीवन शिक्षण विभागा मार्फत विद्यार्थी स्वालंबी जीवन जगण्यासाठी अजीवन शिक्षण विस्तार विभागाचा मुख्य उद्देश आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये व्यवसायभिमुख शिक्षण निर्माण करण्यात आलेले आहे.पारंपरिक शिक्षणापेक्षा व्यवसायिक शिक्षण फार महत्त्वाचे आहे. विद्यार्थी शिक्षण घेत असताना आत्ता कुठल्याही शाखेचे बंधन राहिलेलं नाही. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या शाखेमध्ये आपले करिअर घडविता येईल.नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्याला ज्या क्षेत्रामध्ये आवड आहे त्या क्षेत्राची निवड करून या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये आपले ध्येय उद्दिष्टे साध्य करावेत हीच प्रमुख भावना उद्दिष्टे या नवीन शैक्षणिक धोरणाचे आहे नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जे विविध सूक्त गुण होते ते सुप्त गुण अशा धोरणामुळे नक्कीच बाहेर येतील आणि कौशल्य आधारित शिक्षण प्रणाली जास्तीत जास्त प्रमाणात विकसित होईल असा आशावादही त्यांनी शेवटी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रस्ताविक डॉ.पवार बी.टी यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार डॉ.पंडित मुळे यांनी मानले. या कार्यशाळेस महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

अहवाल ५

# विद्यार्थी समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

१) सत्र पहिले. दि. २६ डिसेंबर २०२३

---

विद्यार्थी समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत व्यक्तिमत्व विकास या विषयावर डॉ. विठ्ठल मुंडे यांनी सांगितले की, व्यक्तिमत्व विकास घडवण्यासाठी विद्यार्थी आपल्या जीवनात जिद्द, चिकाटी, नियोजन, मेहनत करून आपल्या जीवनात परिवर्तन घडवता येते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी ए प्लॅन बरोबर बी प्लॅन जीवनात आखून ठेवावेत. ए प्लॅनवर यशस्वी नाही झाला तर प्लॅन बी यशस्वी करावा. यामुळे विद्यार्थ्यांना जीवनात स्थिरता मिळेल.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. पंडित मुळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी कायम तत्पर राहिले पाहिजे. वेळ वाया जाणार नाही याची काळजी विद्यार्थ्यांनी घेतली पाहिजे. जीवनात यशस्वी होण्यासाठी नोकरीबरोबर व्यवसायाला प्राधान्य दिले पाहिजे. यशस्वी होण्यासाठी कायम आपले काम करत राहिले पाहिजे.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. तुपे सरांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, जीवनात कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे. यामुळे जीवनात आत्मनिर्भर होता येते. यशस्वी जीवन जगण्यासाठी कायम कार्यरत राहणे, हे यशस्वीतेचे गमक आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पवार बी. टी. यांनी केले तर आभार डॉ. पवळे एन. डी. यांनी मानले.

---

अहवाल ६दि. २६ डिसेंबर २०२३

# सत्र दुसरे

## लेखन व संभाषण कौशल्य या विषयावर मराठी विभाग प्रमुख डॉ. अशोक घोळवे व डॉ. नवनाथ पवळे यांनी मार्गदर्शन केले.

---

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. अशोक घोळवे म्हणाले की, संभाषण हे एकमेकांच्या भावना जाणून घेण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. वाचन आणि लेखन करण्यासाठी भाषिक कौशल्य अतिशय महत्त्वाचे आहे. संभाषण करण्यासाठी वाचन व लेखन करणे विद्यार्थ्यांना अतिशय गरजेचे आहे.

या सत्राचा समारोप करताना डॉ. नवनाथ पवळे म्हणाले की, संभाषण करण्यासाठी वेगवेगळ्या भाषेचा उपयोग केला जातो. चिन्हांची भाषा आपणास वाचन करताना उपयोगी पडते. व्यक्ती दोन भाषेत एकमेकांना बोलत असतील आणि त्यांची भाषा वेगळी असेल तर ते संभाषण योग्य ठरत नाही. त्यामुळे दोन व्यक्ती संभाषण करताना त्यांची भाषा एक असली पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांनी संभाषण करताना लेखन व संभाषण कौशल्य अंगीकारले पाहिजे तरच आपण योग्य प्रकारे संभाषण करू शकतो, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पवार बी. टी. यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. विठ्ठल गुंडे यांनी मानले.

अहवाल ७बुधवार  दि. २६ डिसेंबर २०२३

# सत्र 3

---

विद्यार्थी समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन या कार्यशाळेचे तिसऱ्या सत्राचे वक्ते डॉ. संजय सावते यांनी स्पर्धा परीक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी पूर्व परीक्षा आणि मुख्य परीक्षा यांचे शेडूल लक्षात घेऊन अभ्यास करायला पाहिजे. परीक्षा देत असताना वेळेचे नियोजन करून त्या पद्धतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना फार सोपी वाटते, परंतु इतकी सोपी ती नाही. हाडाची काडी केल्यानंतर स्पर्धा परीक्षेत यश मिळत असते.

दुसरे वक्ते डॉ. सुधीर येवले यांनी स्पर्धा परीक्षा मार्फत घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षांचे विवेचन केले. स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी जिद्द आणि चिकाटी त्याबरोबर परिश्रम करण्याची ताकद यावर जोर दिला पाहिजे, असे सांगितले. किये बिना कोई काम आसान नही होता, असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी योग्य वेळी वेळेचा उपयोग केल्यास कुठलेही परीक्षेत उत्तीर्ण होता येते. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी जीवनात कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे तेव्हा अशा परीक्षेत यश मिळवता येते. लेखी परीक्षेबरोबर तोंडी परीक्षेचे योग्य नियोजन करून तयारी केली तर यशस्वी होता येते, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पवार बी. टी. यांनी केले तर आभार डॉ. पंडित मुळे यांनी मानले.

अहवाल ८बुधवार   दि. २६ डिसेंबर २०२३

# सत्र ४

---

या सत्रामध्ये यशस्वी उद्योजक माननीय संदीप ढाकणे यांची मुलाखत डॉ. पवार बी. टी. यांनी घेतली. प्रथम त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांच्या उद्योगा विषयी अनेक प्रश्न विचारण्यात आले. त्यांनी त्यांच्या उद्योगा विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अनेक प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली. त्यांच्या मुलाखतीतून इतका अर्थ काढता येईल की, जीवनात यशस्वी होण्यासाठी तुमच्याकडे कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे, यशस्वी उद्योजक तेव्हा बनतो. त्याने वेळेनुसार नियोजन करून बाजारपेठेचा अभ्यास केला पाहिजे. बाजारपेठेत जे आवश्यक आहे, ते उत्पादन निर्माण केले. पाहिजे त्या मागणीवरून उत्पादन निर्माण करून योग्य भाव मिळवला पाहिजे. जीवनात अडचणींना सामोरे जाताना कठोरपणा आणि लवचिकता हे दोन्ही गुण जवळ असले पाहिजेत. उद्योगांमध्ये नफा आणि तोटा या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. तोटा झाला तर तणावात येऊ नये व नफा झाला तर भारावून जाऊ नये. यशस्वी उद्योजक होण्यासाठी त्यांनी काही कानमंत्र दिले. पाया जर मजबूत असेल तर इमारत टिकाऊ बनते. अशी अनेक उदाहरणे त्यांनी दिली. जीवनात यशस्वी उद्योजक बनायचे असेल तर जिद्द, चिकाटी, वेळेचे नियोजन व सदुपयोग केला तर जीवनात यशस्वी उद्योजक बनता येते, असे ते शेवटी म्हणाले. या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. विठ्ठल गुंडे यांनी मानले.

अहवाल ९बुधवार  दि. २६ डिसेंबर २०२३

# समारोप समारंभ

सत्र ५

---

दोन दिवशी विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचा समारोपाला प्रमुख पाहुणे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब येवले होते कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे होते. पुढे बोलताना आप्पासाहेब येवले सर म्हणाले की, युवकांनी आपल्या जीवनात शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे. कारण शिक्षण हे व्यक्तीचा सर्वांगीण विकास करते. शिक्षणामुळे व्यक्तीला वाचनाची गोडी निर्माण होते. युवकांनी आपले जीवन चांगल्या प्रकारे जगण्यासाठी शिक्षणाचा उपयोग केला पाहिजे. जगण्यासाठी ज्यावेळेस आपण संघर्ष करतो त्यावेळेस शिक्षणामुळे आपल्याला काही पर्याय उपलब्ध होतात. सरकारने शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे यासाठी उत्तम कार्य चालू केलेले आहे. शिक्षणाचा उद्देश फक्त नोकरी करणे इतका नव्हे तर व्यवसाय करण्यासाठी शिक्षण हे उत्तम मार्ग आहे, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य कंधारे सर म्हणाले की, अशा कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना बौद्धिक मेजवानी मिळत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या कार्यक्रमाचा लाभ घेऊन आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कष्टाला पर्याय नाही. जीवनात चांगले घडवायचे असल्यास शिक्षणाची तत्वे स्वीकारली पाहिजेत, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पवार बी. टी. यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सुधीर येवले यांनी केले.